# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXVI | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2024 MAY | No. 04


## पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

गीतशास्त्र ७५:१-९

१. हे देवा, आम्ही तुझे उपकारस्मरण करितो; तुझे उपकारस्मरण करितो, कारण तुझे नाम समीप आहे; तुझ्या अद्भुत कृत्यांचे वर्णन लोक करितात.

२. नेमिलेली वेळ आली म्हणजे मी यथार्थ न्याय करीन.

३. पृथ्वी व तिच्यावर सर्व राहणारे भेदरुन गेले तरी तिचें स्तंभ मीच स्थापिले आहेत.

४. फुशारकी मारणाऱ्यांस मी म्हणालो, फुशारकी मारुं नका; आणि दुर्जनांस म्हणालो शिंग उंच करुं नका;

५. तुम्ही आपले शिंग उंच करु नका; ताठ मानेनें बोलू नका.

६. कारण उन्नति ही पूर्वेकडून नव्हे, पश्चिमेकडून नव्हे, व अरण्याकडूनहि नव्हे;

७. तर न्याय करणारा देव आहे; तो एकाला खाली घालितो व दुसऱ्याला वर आणितो.

८. पाहा, परमेश्वराच्या हाती प्याला आहे व त्यांत द्राक्षारस फेसाळत आहे; त्यांत मसाला मिसळला आहे आणि त्यांतून तो ओतून देतो; त्याचा गाळ पृथ्वीवरील सर्व दुर्जनांस खातरीने निथळून प्यावा लागेल.

९. मी तर सदा आनंद करीन, याकोबाच्या देवाची स्तोत्रे गाईन.

## आमच्या प्रभुचे मातृ हृदय!

## OUR LORD'S MOTHERLY HEART!



"आई मनुष्यांचे सांत्वन करिते तसें मी तुमचे सांत्वन करीन...." (यशया ६६:१३)

*मानद् प्रमुख संपादक, रेव्ह. अॅन्जेलीन सेल्वाकुमारी*



आम्हांस स्वर्गीय आशीर्वादांनी आशीर्वादीत करणाऱ्या आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या बहुमोल नामात तुम्हा सर्वांना शुभेच्छा. या महिन्याला विशेष महत्त्व आहे कारण एको ऑफ हिज कॉल जगभरातील सर्व मातांना 'मातृदिनाच्या' अगदि मन:पूर्वक शुभेच्छा व्यक्त करीत आहे. हा प्रसंग अनेकां आनंद देणारा असताना अनेकांना दु:खाच्या भावना उंचबळून येणारा देखील असणार. "मी माता नाहि, मग मी हा संदेश वाचण्याची तसदि कां घ्यावी." असा विचार मनांत येण्या अगोदर "मातृदिन" हा सर्व ज्यांना मातेचा संगोपन करणारा आत्मा आहे, अशा सर्वांनी साजरा करण्याचा दिवस आहे. तुम्ही पिता असाल, भाऊ, मामा-काका, बहिण किंवा मामी-काकी असाल, ज्या तुम्ही मातेची जबाबदारी पार पाडण्याची भूमिका स्विकारली असेल त्या तुम्ही हा तुमचा दिवस आहे असे मानून त्यागयुक्त प्रेम आनंदाने साजरे करा.

(...पान ३ वर)




एको ऑफ हिज कॉल — पाच मिनिटांचा संदेश

यू ट्युब ख्रिश्चन चॅनल

पास्टर सॅम सेल्वा राज

यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

Every day – From 2.00 A.M.

प्रतिदिनी - पहाटे पाच वाजता    रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

REACHING NATIONS



# तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...

**''परंतु धार्मिकांचे तारण परमेश्वरापासून होते; संकटसमयी तोच त्यांचा दुर्ग आहे.''**

(स्तोत्र ३७:३९)



## आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


HON. EDITOR-IN-CHIEF

Rev. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.

HON. MANAGING EDITOR

Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

GENERAL MANAGER

Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM., MBA.

ADMINISTRATION

Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)

EDITORIAL BOARD

Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Sis. L. Mariya Anjalin, M.A., M.Sc., B.Ed.
Rev. Dr. K.R. Rajasekaran



EDITOR, PUBLISHER & PRINTER

Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers


10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858 95661 31858

E.MAIL

sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

WEBSITES

www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

YOUTUBE CHANNEL

Echo of His Call


ख्रिस्तामधील अति प्रियांनो,

**आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताचा पिता देव धन्यवादित असो...''** (१ पेत्र १:३)

तुमच्या अढळ प्रार्थना आणि भक्कम आधाराबद्दल आम्ही मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त करित आहोत. तुमचय औदार्याबद्दल आणि त्याच्या सेवेतील जबाबदारी देव तुम्हाला विपुल आशीवार्दीत करो.

एप्रिल महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात लेकरांकरिता घेण्यात आलेल्या सुट्टितील शास्त्राभ्यास शाळा, देवाच्या विपुल आशीर्वादामुळे यशस्वी झाल्याचे सतत जाणवत होते. या शास्त्राभ्यास शाळेकरिता अतिशय दक्षतेने तयार करण्यात आलेल्या पवित्र वचनाच्या अभ्यासक्रमामुळे चेपॉक, वेलाचेरी, बालाजी नगर, आणि संतोषपुरम येथील शेकडो लेकरांना ते शिक्षण अतिशय आशीर्वादीत झाले. आम्ही देवाने केलेल्या तरतुदीबद्दल आणि देवाच्या सर्व समर्पित सेवकांच्या अथकपणे सेवेतील सहभागाबद्दल दाद देत आहोत.

आम्ही पास्टर एस्. सॅम सेल्वाराज यांचे आत्मचरित्र पुस्तक रुपाने पूर्ण करण्याच्या शेवटच्या टप्यात आहोत. त्यांच्या सेवेद्वारे तुमच्या आत्मिक जीव-जीवनावर कशाप्रकारे प्रभाव पडला हे तुम्ही दहा ओळींच्या साक्षी द्वारे लिहून कळविले आणि सोबत तुमचा फोटो जोडला तर आम्हाला



*पाळक एस्. साम सेल्वाराजची आत्मचरित्रची टीम*

पुस्तकात समाविष्ट करण्यास आनंद होईल.

आम्ही पुढील महिन्यात पदापर्ण करीत असताना, शिघ्र कृति करावी लागणार आहे. आमच्या बायबल कॉलेजचे पन्नास विद्यार्थी त्यांचा आभ्यासक्रम पूर्ण करण्याची तयारीत असताना त्यांना आधार देण्याचे टाळता येणार नाही. हे एकनिष्ठ विद्यार्थी लवकरच दुर्गम आणि आव्हानात्मक विभागात जोखमीच्या सेवा कार्याची जबाबदारी स्विकारणार आहेत. दिक्षांत विधी १ जून २०२४ रोजी आयोजीत करण्यात आला आहे. जो त्यांच्या आत्मिक जीवनाच्या प्रवासाचा प्रगतिनिर्देशक ठरणार आहे. या दरम्यान नहेम्या बायबल कॉलेजच्या नवीन विद्यार्थ्यांचे वर्ग ३ जून २०२४ पासून सुरू होतील.

नहेम्या बायबल कॉलेजकरीता हिन्दी उत्तम प्रकारे लिहिता-वाचता येणारे विद्यार्थी

मिळावेत यासाठी आग्रहाने प्रार्थना करावी अशी नम्रतेने विनंती करीत आहोत. आणखीन या सेवांकरीता जे प्रयत्न करीत आहेत; त्या मध्ये प्रभु मार्गदर्शन आणि पुरवठा करावा अशी विनंती करीत आहोत. गावातील सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल यासाठी विद्यार्थी आणि शिक्षक यांची निवड करण्यास देवाच्या दैवी मार्गदर्शना करीता प्रार्थना करण्यास एकत्र होऊ या.

असंख्य अशी आव्हाने, अडखळणे आणि अत्यावश्यक गरजां यांना सामोरे जाण्यास सध्या प्रार्थनांची अतिशय गरज आहे. आमच्या सेवाकार्यांकरिता सतत मध्यस्थिच्या प्रार्थना कराव्यात हे जाणून कि केवळ देवाच्या कृपेद्वारे आणि दरोद्वारेच प्रत्येक अडखळांवर विजय प्राप्त करता येतो.

तुम्हा सर्वांना आम्ही आमच्या प्रार्थनांत उचांवून धरीत असताना बंधनविरहीत अशी देवाची कृपा तुमच्यावर विपुलतेने ओतली जावी. आमेन!

देव तुम्हा सर्वांना विपुल आशीर्वाद देवो.

ख्रिस्त येशू मध्ये तुमचे दास.

**पास्टर एस्. सॅम सेल्व राज आणि**
**अॅलेक्स सॅमसन सॅम**
(+91) 9841271858/9841071858
E-mail : sam@echoofhiscall.org

★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★

## त्याच्या बोलाविण्याचा प्रतिध्वनी मासिकाच्या वाचकांनो – लक्ष द्या

**एको ऑफ हिज कॉल** यूट्युब चॅनलवर आमचे ५ मिनिटांचे मननपर संदेश दररोज पहाटे २.०० वाजता तामिळ, तेलगू, इंग्रजी आणि हिन्दी या भाषांमध्ये प्रसारीत केले जात आहेत. संदेश ऐकून तुम्ही देवाची कृपा प्राप्त करु शकता.

आणखी माझे मोबाईल क्रमांक (+९१)९८४१०७१८५८, आणि (९१)९८४१२७१८५८ (वैयक्तिक) तुमच्या मोबाईलमध्ये जतन करुन ठेवा.

**- पास्टर एस्. सॅम सेल्वा राज**

★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★

(पान १ वरुन...)

### देवाचे मातेसमान प्रेम!

बिनशर्त स्वार्थत्यागी प्रेमाचा विचार मला ज्या येशू ख्रिस्ताने आपल्या तारणाकरिता स्वखुषीने क्रुसावर त्याचा प्राण दिला त्यावर विचार करण्याकडे नेतो. त्याची स्वत:चे जीवन देऊ करण्याची कृति त्याचे असामान्य प्रेम सिद्ध करते. देवाचे प्रेम आपण अनेकदा प्रेमात पाहातो. तेव्हा शास्त्र वचन देखील अनेक उदाहरणांनी आईचे स्वभाव गुण चित्रीत करते.



यशया ६६:१३ देवाला 'सांत्वन करणारी माता' असे चित्र रेखाटतो. आणि मत्तय २३.३७ देवाच्या प्रेमाची तुलना मातेच्या बिनशर्त नि:स्वार्थी प्रेमाशी करितो.

एका वेळी देवाला, तो कडक शिस्त लावणारा, सुधारणारा आणि शिकविणारा आहे असे त्या विषयी बोलतो आणि दुसऱ्या वेळी तो संगोपन करणारी माता, ज्याचे प्रेम बिनशर्त, आपल्या उणीवां झाकणारे आणि न्याय न करिता पोषण करणारा आहे अशी त्याजविषयी साक्ष देतो.

या विशेष प्रसंगी, माझी अशी प्रार्थना आहे, देव तुम्हाला मातेच्या ममतेने घट्ट आलींगन देवून विशेषत: या एकाकी क्षणांमध्ये सतत आधार आणि सहवास द्यावा. त्याची उपस्थिती तुम्हाला त्याच्या बिनशर्त प्रेमाने तुमच्या मार्गात प्रत्येक पाऊलास धीर देवो.

### बायबलमधील स्त्रिया

देवाच्या मातेच्या गुणधर्मा विषयी मनन करीत असताना बायबलमधील ज्या अनेक मातांनी आव्हानात्मक परिस्थितीत त्यांच्या कुटुंबाला उभे करण्यात जे असाधारण धैर्य प्रदर्शीत केले. त्या स्त्रियांकडे माझे विचार आकर्षित होतात. त्या स्त्रियांत प्रामुख्याने हागारसमोर उभी रहाते.

### १) हागार कोण होती?

अनेकजण कदाचीत तिच्या विषयीच्या गोष्टि विषयी परिचीत असतील; परंतु ज्यांना तिची ओळख नाहि अशाकरीता मला ती करुन देवू . हग्गार, हे नाव "त्यागलेली" किंवा "पळून जाणारी" असे सुचविते. थोडक्यात एक अप्रसिद्ध, पूर्णपणे ओळखी विरहीत आणि बहुतेक करुन चेष्टा किंवा टिंगल केलेले जीवन. मूळची मिसर देशातली गुलाम मुलगी, ती निपुत्रीक अब्राहाम आणि

### कृपा करून प्रार्थना करा!

उन्हाळी सुट्टीतील बायबल शाळा एप्रिल आणि मे २०२४ मध्ये आमच्या मंत्रालयांद्वारे संपूर्ण भारतात आयोजित केली जाईल. आम्हाला तुमच्या प्रार्थनेची गरज आहे.

**- संपादक**

सारा, यांच्या घरांत येते. अचानक अनेपेक्षितपणे - सारा संपत्याच्या अपेक्षेने अब्राहामास तिला त्याची पत्नी होण्यास देते. थोडक्याच कालावधीत हागारेच्या स्थानाचे स्वरुप एका साध्या मोलकरणी/दासी पासून घरांतील स्त्रियांतील महत्वाच्या अशा दुसऱ्या क्रमांकाच्या स्वरुपात होते. त्यानंतर लगेच ती गर्भवती होऊन इश्माइल यास जन्म देते. आणि तीचे स्थान अधिकच वाढते.

निसंशय, हागारने तिला नव्याने प्राप्त झालेले महत्त्व, तिच्या वर्तुणुकी द्वारे आणि परस्परां बरोबरील प्रतिक्रियेत विशेषत: अब्राहामाच्या पहिल्या पत्नीशी प्रकट करु लागली असेल. आब्राहाम देखील वंश पुढे चालविण्या करीता वारस मिळाल्यामुळे आनंदीत झाला, हे न जाणून कि देवाची तयच्या वंशावळी करीता वेगळी योजना हेती. तथापी हागारच्या सारा बद्दलच्या वागणूकीत मेहरबानीची छटा होती. त्यामुळे त्यांच्या नातेसंबंध चिघळला. अखेरीस देवाने दिलेल्या अभिवचनानुसार जेव्हा साराने मुलाला जन्म दिला, त्याने तिच्या स्वत:चा मुलगा इसहाक याचा वारसहक्क हागारेच्या मुलाबरोबर वाटण्याच्या कल्पना उलटून लावली. परिणामी साराने अब्राहामास हागार आणि तिचा मुलगा इश्माईल या दोघांना घरातून हद्दपार करण्यास भाग पाडले. अशा रितीने आब्राहामाने तिचा त्याग केल्यावर हागार अरण्यात गेली. तिच्या नावाच्या अर्थानुसार अरण्यात सापडली. शास्त्रातील स्त्रियांबद्दल सांगितल्या प्रमाणे अगदी एकटी, तिच्या मुलाला घेऊन अरण्यात भटकत राहिली.

## २) भाग घेण्यास तयार नसणारी हागार

आब्राहामाशी विवाह करण्याबाबत कोणीहि विचारविनिमय केला नाहि, आणि त्याच्यापासून विभक्त होण्याची ती तयार आहे कां याबद्दल देखील कोणी चौकशी केली नाहि. तिचय संपूर्ण जीवनात तिच्या निवडी संबंधात ती सहभागी होण्यास तयार नाहि असे समजून इतरांनी निर्णय घेतले. आपल्यापैकी किती जण भाग घेण्यास तयार नाहि अशी प्रतिक्रिया मान्य करतील? हागारची स्वायत्तेची कमतरता नजरेतून न सुटणारी आहे. तीला स्वत:चे मन व्यक्त करण्याचा अधिकार नव्हता. पुरुष असो किंवा स्त्री असो, विलाप-शोक करील, ''माझी शक्ती कोणी जाणून घेतली नाहि, माझ्या इच्छा किंवा काय वाटते याचा कोणी विचार केला नाही. आता मी माझे जीवन इतरांनी घेतलेल्या निर्णयानी आकार दिलेले असे जीवन जगत आहे.''

प्रिय मित्रांनो, बायबल आपल्याला अशी खात्री देते, जर आपण देवावर भरोसा ठेविला तर सर्व गोष्टि कल्याणाकरिता घडतात. सध्या जरी तय अर्तकर्य किंवा अगम्य वाटल्या, देवाच्या विचाराशिवाय काहि घडत नाही. आपल्या भल्याकरिता भयजनक परिस्थिती देखील बदलण्याचा अधिकार त्याला आहे. आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताची अशी शक्ति आहे - तो कोणतीही परिस्थिती आपल्या बाजूने फिरवू शकतो. हागारेकरिता देवाने जे योजीले आपल्याला जरी ते समजुशकत



*हागार त्याच्या मुलाबरोबर अरण्यात*

(...पान ६ वर)


# NEHEMIAH BIBLE

**RESIDENTIAL / EVENING COLLEGE,**

Velachery / Chepauk & Santhoshapuram, Chennai.

Medium : Hindi / Tamil

Registered Candidate for Membership

Asia Theological Association (ATA)

Recognised by International Christian Leaders & Senior Pastors for the past 54 years

Qualification : 10th Standard & above

Certificate in Ministry

Diploma in Theology

Rush for admission!

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

✶ ONLINE CLASSES ARE AVAILABLE ✶

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES
SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ मे ते १८ जुन २०२४ पर्यंत

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✝ याकरीता देवाची स्तुती करा...

१९ मे : आमची **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल, नहेम्या बायबल कॉलेज,** आणि **पत्रव्यवहाराद्वारे** करण्यात येत असलेला **थियॉलॉजीकल आभ्यासक्रम** हे गरजवंतांच्या सेवेस समर्पित आहेत.

२० मे : आमच्या भाषांतरकार, सहसंपादक, समन्वयक आणि त्यांच्या कुटुंबांवर असलेल्या देवाच्या आशीर्वादाबद्दल.

२१ मे : आमचे वरिष्ट पाळक आणि त्यांच्या कुटुंबाला सर्व प्रकारच्या दुष्ट शक्तिंपासून सुरक्षित ठेविल्याबद्दल.

२२ मे : त्याने आमच्या प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासतील भागीदार, आजीवन भागीदार आणि महान आज्ञापालनातील भागीदार, यांच्या सहित त्यांच्या कुटुंबियांना दयेने कवटाळल्याबद्दल.

२३ मे : पत्रव्यवहाराद्वारे करण्यात येत असलेल्या **बायबल** आणि **थियॉलॉजीकल अभ्यासक्रमात** वाढ झाल्याबद्दल.

२४ मे : आमच्या सेवाकार्यातील सर्व गरजा आश्चर्यकारकरित्या पूर्ण केल्याबद्दल उपकारस्मरण स्तुती करु या.

२५ मे : आमच्या मुख्य मंडळीतील आणि शाखामंडळ्यांतील सर्व सभासदाना आशीर्वादीत करीत असल्याबद्दल.

२६ मे : सर्व राष्ट्रांना गोंधळाच्या परिस्थितीत आणि युद्धाच्या धमक्यांमध्ये दैवी सुरक्षितता प्राप्त व्हावी.

२७ मे : राजकीय आणि धार्मिक विरोध होत असताना देखील ख्रिस्ती सेवाकार्याची वाढ होणे सुरु आहे.

२८ मे : समाजातील सर्व स्तरांवर महिलांच्या अधिकाराला समर्थन मिळत असल्याबद्दल.

२९ मे : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल** करीता उत्तम ख्रिस्ती शिक्षक आणि प्रिन्सिपल देवून आशीर्वादीत केल्याबद्दल.

३० मे : आमच्या मुख्य आणि सर्व शाखा मंडळ्यांच्या पाळकांना आणि वरिष्ठ पुढाऱ्यांना आशीर्वाद दिल्या बद्दल.

३१ मे : **एको ऑफ हिज कॉल**च्या सर्व कार्यांचे, सर्व स्टाफ आणि त्यांच्या कुटुंबियांना सुरक्षित ठेविल्या बद्दल.

०१ जून : आमच्या निवासी आणि सायंकालीन **नहेम्या बायबल कॉलेज** करीता नवीन विद्यार्थी पुरविल्या बद्दल.

०२ जून : **शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय** आणि समर्पित कर्तुत्ववान स्टाफ करीता.

०३ जून : आमच्या पांच मिनिटांच्या यूट्युब चॅनलच्या वर्गणीदारांत होत असल्याला वाढी बद्दल आणि साक्षी बद्दल.

## ✝ कृपया यासाठी प्रार्थना करा...

०४ जून : तरुण वर्गात हिंसात्मक आणि हत्या करण्याच्या दुष्ट आत्म्याच्या प्रवृत्ती पासून सुटका व्हावी आणि त्यांना पवित्र आत्म्याने भरुन जावे.

०५ जून : कुटुंबात शांति नांदावी.

०६ जून : जगभरातील ख्रिस्ती शैक्षणीक संस्थांचा नाव लौकीक राखला जावा.

०७ जून : ख्रिस्ती जनांनी देवाचे वचन आत्मसात करुन ख्रिस्त सदृश्य जीवन प्रदर्शीत करावे.

०८ जून : आमच्या सेवाकार्याच्या विस्तारा करीता आणि जागतिक सुवार्ता प्रसारा करीता.

०९ जून : आमच्या वरिष्ठ पाळकांच्या आत्मचरित्र लिखाण यशस्वी व्हावे.

१० जून : सर्व मंडळ्यांतील द्वेष भावना पसरविणाऱ्या शक्तींपासून दैवी संरक्षणा करिता विनंती करा.

११ जून : सर्व राष्ट्रात शांतता आणि आर्थिक प्रगतीसाठी.

१२ जून : शुभवर्तमान न पोंहचलेल्या सर्व विभागांत ते नेण्याकरिता आम्हाला सक्षम करावे.

१३ जून : आमच्या सेवाकार्याची सर्वत्र आणि सर्व प्रकारे विस्तार व्हावा.

१४ जून : सर्व ख्रिस्ती संस्था आशीर्वादीत आणि सुरक्षित असाव्यात.

१५ जून : **नहेम्या बायबल कॉलेज**च्या निवासी आणि सायंकाळीन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षा करिता विद्यार्थी प्राप्त व्हावेत.

१६ जून : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल** साठी २०२४-२५ शैक्षणीक वर्षाकरिता प्रवेशासाठी नवीन विद्यार्थी मिळावेत.

१७ जून : आमचे सेवाकार्य सुरु रहावे याकरिता आम्हांस प्रार्थना आणि आर्थिक सहाय्या द्वारे आधार देत असलेल्या सर्वांकरिता.

१८ जून : या पृथ्वीतलावर त्याच्या राज्याच्या वाढीकरिता अनेक संकल्प आणि दृष्टांत द्यावेत.

(पान ४ वरुन)

नसले, तरी तो सर्व गोष्टी आपल्या बाजूने घडवून आणतो, जर आपण तयजवर अवलंबून राहिलो. स्तोत्र : ३१:१८. जाहिर करते, कि आपले भविष्य त्याच्या हातात आहे. तुम्हाला वाटत असेल कि तुम्ही हागारे सारखे अरण्य ओलांडीत आहात, पुढे भविष्यात काय वाढून ठेविले आहे याची शास्वती नाही अशावेळी समाधान माना, देव नियंत्रण करीत आहे; तो मार्गात तुम्हाला मार्गदर्शन करील. त्याचा हात धरा आणि हागाराचे उदाहरण समोर ठेवून तुमची इच्छा त्याच्या इच्छेस समर्पित करा.

बायबल उत्पात्ति २१:१४ या वचनात सांगत आहे - ''नंतर अब्राहामाने मोठ्या पाहाटेस उठून भाकरी व पाण्याची मसक आणून हागारेच्या खांद्यावर ठेविली आणि तिचा मुलगा तिच्या हवाली करुन तिला रवाना केले, ती निघून बैदशेबाच्या अरण्यात भटकत राहिली. आब्राहाम, एक धनवान पुरुष, त्याने गोंधळलेल्या स्थितीत केवळ भाकर आणि पाण्याची मसक तिला दिली. त्याच्याकडून अपेक्षा केली असेल अधीक उदारपणे अधीक द्यावे - कदाचित त्या सोबत दास देऊन त्याच्याकडे पुष्कळ पुरवठा द्यावा. त्याने तसे केले नाहि. कदाचित जरी त्याचा उद्देश स्पष्ट नसला तरी हागारने देव तिचा रक्षणकर्ता आणि पुरवठा करणारा आहे हे तिने अनुभववाने अशी त्याची इच्छा होती.



*हागार त्याच्या मुलासाठी रडतो*

अरण्यात त्यागलेल्या आणि एकट्या स्थितीत तिच्या मुलाचे संगोपन करण्याचे हिंमत खचविणाऱ्या कामास सामोरे जावे लागले. आर्थिक पाटबळ नाहि किंवा विसंबून राहाण्यास कुटुंब नाहि अशा कठीण परिस्थिती तिला सहन करावी लागली. यशया ५४:५ या बायबलच्या वचनात म्हटले आहे. ''**तुझा निर्माणकर्ता तुझा पति आहे; सेनाधीश परमेश्वर हे त्याचे नाम, इस्त्राएलाचा पवित्र प्रभु तुझा उद्धारकर्ता आहे...**'' बायबल अशा स्त्रीस देव त्यांच्या पति आणि पुरवठा करणारा आहे असे आश्वासन देऊन समाधान आणि उत्तेजन देते.

## ३) हागार आणि तिचा मुलगा!

हागार आणि तिच्या मुलासाठी कसोटी निसंशय दमवून टाकणारी होती, त्यावर कळस म्हणजे तिच्या मुलाची स्थिती मुलाचा मृत्यु जवळ येऊन ठेपला हे पाहून तिचे हृदय - पिळून निघाले असणार. उत्पत्ति २१:१६ या वचनात लिहिले आहे, ''... **मी आपल्या मुलाचा मृत्यु डोळ्यांनी पाहू नये...**''

ती हताश आणि शकिहिन स्थितीत तो जीवंत राहावा यासाठी त्याचकडे तोंड करुन बसून हंबरडा फोडून रडू लागली. कल्पना करा, प्रिय असलेली हातात घट्ट धरलेली वस्तू हातातून निसटून जात असलेली पाहून होणाऱ्या दु:खाची कल्पना करा. हागार मदतीकरीता देवाकडे वळते.

आईच्या सुंदर स्वभाव गुणाचा खोल विचार करताना, देवमातांना त्यांच्या लेकरांसाठी पाण्याच्या नळासारखा उपयोग करुन घेतो हे पहातो.

## एका आईची तिच्या मुलाकरिता आग्रहाची विनंती!

### अ) आईने जेव्हा आकांत केला, देवाने तिच्या मुलाच्या आत्यंतिक गरजेकडे आकलन केले!

त्यांच्या मसकीतले पाणी संपले तेव्हा हागार आणि तिच्या मुलाची शक्ति संपली, हागार निराशेच्या आधीन आणि अपरिमीत यातने खाली दबून गेली, तिला मुलाचा जवळ आलेला मृत्यु पाहू शकत नव्हती. ती दोघे अरण्यात निरर्थक; दिशाहिन, भविष्यासाठी कांहि आशा नाहि अशा स्थितीत भटकत होते. पाणी-भाकर संपल्या तिला तिच्या मुलाचा जवळ येत असलेला मृत्यु पहावा लागत असह्य झाले.

आणि ती बाणाच्या टप्याइतकी दूर जाऊन त्याच्याकडे तोंड करुन बसली. ती मनात म्हणाली, मी आपल्या मुलाचा मृत्यु डोळ्यांना पाहू नये आणि ती हंबरडा फोडून रडू लागली.


आई जेव्हा आक्रोश करिते, देव तिच्या लोकांच्या स्थितीकडे पाहातो. आपल्या प्रार्थनाद्वारे देव केवळ ऐकूनच नाहि तर तो

(...पान ९ वर)


# नहेम्या बायबल कॉलेज

## पदवीदान सभा, २०२३-२०२४





**स्थळ** : बी.के.एन्. हॉल, व्यापारी, चेन्नाई - ०७

**दिनांक** : १ जून २०२४ (शनिवार)

**वेळ** : सायंकाळी ५ वाजता

एकूण ५० विद्यार्थी त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करणार आहेत आणि त्यांना मिशन क्षेत्रांत पाठविले जाईल.

आम्हाला २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षाकरिता तामिळ आणि हिन्दी भाषिक आभ्यासक्रमाकरिता ७५ विद्यार्थी हवे आहेत यासाठी कृपया प्रार्थना करा.

## कृपया आमच्या मुख्यालयातील सेवाकार्याकरिता प्रार्थना करा

| | | |
|---|---|---|
| १. प्रार्थना सेवा | : | २४ तास |
| २. बायबलकोर | : | पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम : इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी |
| ३. एको ऑफ हिज कॉल | : | मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन |
| ४. नहेम्या बायबल कॉलेज (दोन केंद्र) (सायंकालीन / निवासी) | | |
| ५. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ | | |
| ६. महान आजापालनाचे भागीदार (पाळकांचे नेटवर्क) | | |
| ७. प्रशिक्षण कार्यक्रम | | |
| ८. महासभा | | |
| ९. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा | | |
| १०. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय: | | प्रकाशने |
| ११. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल | : | गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल |
| १२. शब्बाथ शाळा | : | सकाळी ८.३० आणि सायंकाळी ४ वाजता - रविवारी |
| **१३. तामिळ उपासना** | **:** | **सकाळी ८.०० आणि १०,०० वाजता - रविवारी** |
| **१४. हिन्दी उपासना** | **:** | **सायंकाळी ४ वाजता - रविवारी** |
| **१५. तेलगु उपासना** | **:** | **सायंकाळी ५ वाजता - रविवारी** |
| **१६. इंग्रजी आणि तामिळ उपासना** | **:** | **सायंकाळी ६ वाजता - रविवारी** |
| १७. स्त्रियांची प्रार्थना | : | सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी |
| १८. पुरुषांची प्रार्थना | : | सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी |
| १९. शिष्यत्वाची सभा | : | सायंकाळी ६ वाजता - शनिवारी |
| २०. गृह प्रार्थना सभा | : | सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी |
| २१. विशेष प्रभु भोजन | : | पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी |
| २२. सेवाकाची समालोचन सभा | : | सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार |
| २३. पालकांची प्रार्थना | : | सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार |
| २४. रात्रभर प्रार्थना | : | सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शुक्रवार |
| २५. उपास प्रार्थना | : | सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शनिवार |
| २६. पवित्र सहभागिता | : | दुसऱ्या रविवारच्या उपासनेत |
| २७. सकाळचे मनन | : | पहाटे ५ वाजता - दररोज |
| २८. कार्यालयीन स्टाफचे मनन | : | सकाळी ९ वाजता - दररोज |
| २९. कार्यालय | : | सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून) |

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला **'न्यु लाईफ फॉर यू'** या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. **'सर्टफिकेट इन मिनिस्ट्री'** प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्टला** भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST |
| Account Number | : | 1023 2923 805 |
| Bank Name | : | STATE BANK OF INDIA |
| Branch | : | TRIPLICANE, CHENNAI - 600 005 |
| IFSC Code | : | SBIN 0000249 |
| SWIFT Code | : | SBI NIN BB 455 |



# खड्ड्यातून महालापर्यंत
## PIT TO PALACE

**“नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !” (मत्तय २४:१५)**
**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

# आपल्याला येशू ख्रिस्त एक अद्भूत मित्र आहे.

**“मला तर ठाऊक आहे की माझा उद्धारक जीवंत आहे.” (ईयोब १९:२५)**

मला माझ्या सेवेच्या सुरुवातीच्या दिवसात देवाने मंजुर केलेल्या असंख्य परिक्षा आणि कठीण स्थितीतून जावे लागले. आर्थिक अडचणींचे मोठे ओझे मजवर असताना, सेवाकार्यासाठी एक असंभवित कायमस्वरुपी मुख्यालय स्थापन करण्याचा शोध घेण्याचा विचार आला. परिणामी मी माझे निवास्थान आणि कार्यालय सतत बदलू लागलो.

१९८० साली एका भयंकर अशा विशिष्ट असह्य अशा क्लेशाने मजवर आघात केला. ताप आणि वेदना संपूर्ण शरिरात वेगाने फिरत होत्या. आणि विशेषत: मानेला जाणवत होत्या. मी बिकट चमत्कारीक अवस्थेत असल्यासारखे वाटले, माझ्या यातनां वाढण्याचे कारण, मी सेवा करित असलेला विभाग हा स्थानिक अख्रिस्ती लोकांनी व्यापलेला होता. त्यामुळे मी पाठींबा नसलेला असा एकटा होतो. माझ्या अशा तीव्र आजारात आणि एकटे असताना माझ्या एका मित्राला त्यान मजबरोबर एक रात्र काढण्याकरिता विनंती केली. मी त्याला अगोदर मदत केलेली असताना देखील त्याने मजबरोबर एक रात्र राहाण्यास स्पष्ट नकार दिला. त्यामुळष ती रात्र कल्पना करवणार नाहि अशा भयंकर यातनेत काढली.

सकाळी एका दयाळू व्यक्तिने मला सरकारी रुग्णशलयात दाखल केले. तेथे देखील माझ्या दुर्दशेत मी एकटाच होतो. अशा वेदनेत दिवस काढल्यावर, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले की शस्त्रक्रिया करावी लागणार. शस्त्रक्रियेला संमति न देता मी त्याऐवजी प्रार्थना करण्याचे ठरविले. देवाकडे माझे मन मोकळे केले, जगीत सुखसोयीचा कोणताहि पर्याय नसताना, सेवा कार्यात जी अपरिमीत आव्हानांना सामोर जावे लागले ते त्याला सांगितले. “**मी आपला वर्तनक्रम त्याजपुढे मांडिला आणि त्याने माझें ऐकले.**” (स्तोत्र ११९:२६).

तेव्हा, एका महत्त्वाच्या रात्री मी आग्रहाने प्रार्थना करीत असताना, मला देवाच्या आरोग्यदायी हाताचा स्पर्श झाल्याचे जाणवले. मन बरे झाल्याच्या खात्रीने भरुन गेले, आणि मी उपचार करणाऱ्या डॉक्टरना आलेला अनुभव सांगितला. त्यावर त्या डॉक्टरने म्हटले, “मला समजे. अनेक ख्रिस्ती ख्रिस्त येशऊने त्यांना बरे केले असा दावा



*येशु ख्रिस्ताचा दैवी स्पर्श!*

करुन उपचारास नकार देतात. तुम्ही देखील तेच जाहिर करीत आहात.” त्याने मला शस्त्रक्रीये करिता आग्रह न करीता आणि कोणतीहि औषधे घेण्यासाठी लिहून न देता. मला दवाखान्यातून घरी जाण्याची परवानगी दिली. खरोखरीच माझ्या विश्वासानुसार देवाने त्याचे सामर्थ्य प्रकट केले, मला व्याधी मुक्त केले.

३६ वर्षांपूर्वी देवाने मला पूर्णपणे व्याधिमुक्त केले, तेव्हा पासून आज पर्यंत तो आजार मला झाला नाहि. रस्त्याने प्रवासात वाहन चालवित असताना कितीहि खाच-खळग्यांतून जावे लागलेतरी ते पाठीचे दुखणे उद्भवत नाहि. कधी कधी कार्यालयातून संदेश देण्याच्या स्थळी पोहचण्या करिता २० तास प्रवास करावा लागतो, अशा वेळी क्वचितच मला थकवा जाणवतो. देवाचय आरोग्यदायी स्पर्शाने मी केवळ व्याधि मुक्तच झालो अने नाहि त्याने मजवर अशीर्वादांची वृष्टी देखील केली. सुरुवातीस माझ्या बाजूने एकच मित्र होता, परंतु आता देवाने मला जगभरातील अनेक मित्र देवून मला आणि सेवेला समृद्ध केले आहे.

प्रिय मित्रांनो, आपला प्रभु येशू ख्रिस्त या जगाच्या अधिकारात अद्भूत रितीने चालवितो, मार्गदर्शन करतो. त्याला तुम्ही तुमचा मिर्ा आणि देव म्हणून आलींगन द्या, आणि तो तुमचा मार्ग योग्य वेळी प्रकाशीत करील अद्याप त्याला तुम्ही तुमच्या जीवनात आमंत्रण दिले नसेल तर आजच द्या. आणि सेवेच्या प्रवासात दैवी मार्गदर्शनात पुढे व्हा त्याचे नेतृत्व मला दररोज उचलून धरते-आधार देते. माझी खात्री आहे तो तुमच्या बाबतीत देखील ते करील.

यशया ४३:१९ “... मी अरण्यात जले, मरुभूमीत नद्या देणार.”

*******

(पान ६ वरुन)

आपले अश्रु देखील पाहातो आणि यातना जाणतो. अश्रुचा प्रत्येक थेंब बुधलीत भरुन ठेवितो. (स्तोत्र ५८:८) माता जेव्हा त्यांच्या लेकरांसाठी मध्यस्थिती करितात, देव त्यांच्या गरजाकडे लक्ष देतो. बायबल जेव्हा लिहिते, "**देवाने मुलाची दीनवाणी ऐकलि**" तो आईच्या तो आईच्या आक्रोशाला देवाचा प्रतिसाद होता. देव केवळ हागारच्या आक्रोशास प्रतिसाद देत नाहि; तर इश्माईलच्या मुक्या विनंतीस देखील प्रतिसाद देतो.

जर आज तुम्ही तुमचय लेकराकरिता, आग्रहाने प्रार्थना करीत आहात, त्यामागे कारण कोणतेहि असो. केवळ त्याच्याकडेच आरोळी मारा, कारण केवळ तोच तुमची गरज पूर्ण करु शकतो. देवाला शोधा ज्याने क्रुसावर प्राण अर्पून आणि पुन: जीवीत होऊन आपल्या सर्वांकरीता विजय निश्चित केला.

### ब) आईने जेव्हा आक्रोश केला, ती तिच्या मुलाच्या जागी उभी राहिली.

मुलाला शब्द उच्चारण्या करिता शक्ति नव्हती, तेव्हा हागारने त्याची भूमिका घेतली आणि प्रार्थना केली. अशा बोचक क्षणी, आईने तिचा थकून गेलेल्या मुलाच्या बदल्यात मध्यस्थी केली, तिचे श्रेष्ठ प्रेम उतरुन आले. त्याची शक्ती आणि विचार निराश क्षीण झाली होती. तरी त्याच्या ऐवजी तीने आवाज उठवून आरोळी मारली.

मातेच्या त्यागी स्वभावाचे उदाहरण आपल्याला आग्रहाने सांगत आहे, कि आपण आपल्या लेकरांकरीता मध्यस्थीची प्रार्थना केली पाहिजे. कदाचीत तुम्हाला मुलगा किंवा मुलगी असेल जी देवाच्या प्रेमापासून दुरावली असेल किंवा शारिरीक किंवा मानसिक तणावाला मिठीमारलेली असेल. त्यांनी जरी अप्रचलीत प्रार्थना आणि विश्वास आकलन केला, तुम्ही त्या दरीमध्ये उभे राहू शकता. दरी मध्ये उभे रहाण्याकरीता मातेने त्यांच्या आत्मिक आणि जगीक गरजांकरिता देवाकडे आग्रहाने याचना केली पाहिजे.

मातेने प्रार्थना केली तेव्हा देवाने ती ऐकलीय व उत्तर दिले.

आपल्या लेकरांकरिता देवाला त्यांच्या भल्याकरिता विनंती करणे, हि आपली गंभीर कर्तव्य आहे. मातांनो चला आपण प्रार्थना करु या. आपल्या लेकरांकरिता, नातवंडा करता.

**तुझी सर्व मुले परमेश्वरापासून शिक्षण पावतील, तुझ्या मुलांना मोठी शांति प्राप्त होईल.**

**- यशाय ५४:१३**

### क) आईने आक्रोश केला तेव्हा देवाने मुलाला आशीर्वाद दिला आणि भविष्याबद्दलची योजना प्रकट केली!

वचने १८:२०

आईने जेव्हा आक्रोश केला आणि विनंती केली, देवाने केवळ अद्भूत रित्या पाणीच पुरविले असे नाहि; तर मुलाला जीवनदान देखील दिले. त्याने त्याला जबरदस्त भीतिदायक स्वरुपात बदलले. आणखीन आईच्या आग्रहाच्या विनंतीला प्रतिसाद म्हणून तिला इस्माईलचे भविष्य निश्चीत केले.



*हागारचा मुलगा*



*परमेश्वराचा दूत हागारबरोबर बोलतोय*

"**उठ, मुलास उचलून आपल्या हाती घट्ट धर, त्याच्यापासून मोठे राष्ट्र निर्माण होईल असे मी करीन.**" (उत्पत्ति २१:१८)

माता जेव्हा प्रार्थना करतात, लेकरांबद्दलच्या भवितव्याबद्दल दैवी प्रकटीकरण प्राप्त हेते. आपल्या प्रश्नांची इतरत्र उत्तरे शोधू नयेत; प्रार्थना करणाऱ्या मातांना देव ते उघड करितो. प्रार्थना करणाऱ्या मातांचे आच्छादन कवटाळू या, आपल्या लेकरांकरीता अक्रोश करीत दरीत उभे राहू या!


## पाहिजेत

**एको ऑफ हीज कॉलला**
**नहेम्या बायबल कॉलेजसाठी**
*** हिंदी भाषा ***
**ATA-सदस्यत्वासह नोंदणीकृत उमेदवार**

**डीन (निवासी) : अधीष्टाता**
M. Div. / M. Th. Degree
**हिंदी धर्मशास्त्र आणि अनुभवी.**
**बोर्डिंग लॉजिंग आणि वेतन दिले जाईल.**

*पात्र उमेदवारांनी बायोडेटा पाठवावा*
E.mail: sam@echoofhiscall.org
WhatsApp: (+91) 98412 71858


## वाचकांनो लक्ष द्या!

### पास्टर एस्. सॅम सेल्वा राज यांची आत्मचरित्र

पास्टर एस्. सॅम सेल्वा राज यांच्या आत्मचरित्र पुस्तक स्वरूपात छापण्याच्या अंतिम टप्प्यात आहोत. **त्यांच्या सेवेचा तुमच्या जीवनावर कसा प्रभाव पडला याविषयी आम्ही तुमच्याकडून दहा ओळींची साक्ष अपेक्षित आहोत. त्यासोबत आत्मचरित्रात तुमचा फोटो छापण्यात आम्हाला आवडेल.**

**- संपादक**

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## एको ऑफ हिज कोल

**यु ट्युब**
**सबस्क्राईब करा**

जेव्हा तुम्हाला वेळ मिळेल तेव्हा कृपा करुन आमच्या **एको ऑफ हिज कॉल यु ट्युब चॅनल** बघा व सबस्क्राईब करा. धन्यवाद

**- संपादक**

## OUR BANK DETAILS:

### *1. Bank : State Bank of India*

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Triplicane, Chennai-5** |
| Name | : | **S. Sam Selva Raj** |
| A/C No. | : | **1023 2934 679** |
| IFSC | : | **SBIN 00 00 249** |

SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

### *2. Bank : ICICI Bank*

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Anna Salai, Chennai-6** |
| Name | : | **Echo of His Call** |
| A/C No. | : | **6038 0502 2319** |
| IFSC | : | **ICIC 000 6038** |

### *3. Bank : State Bank of India*

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Triplicane, Chennai-5** |
| Name | : | **Echo of His Call Educational Trust** |
| A/C No. | : | **1023 2923 805** |
| IFSC | : | **SBIN 00 00 249** |

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-     आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 13th MAY 2024**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
P.O. Box No. 2957,
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

## *JESUS LOVES YOU!*

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**